सहकार न्यायालय, नांदेड या कार्यालयाचे दि.०५.०२.२०२६ ते दि.०४.०२.२०२९ या ०३ वर्षाच्या कालावधीकरीता भाडेकरार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार विभाग,
शासन निर्णय क्रमांकः जागाभा- २०२६/प्र.क्र.७७/२२ स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक- १५ जुलै, २०२६.

वाचा: १) सहकार आयुक्त तथा निबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्र. स.आ-१५/सवंका/सहकार न्यायालय, नांदेड/कार्याभाडे/५२१/२०२६, दि.२३/०६/२०२६.

प्रस्तावना :-

सहकार न्यायालय, नांदेड हे न्यायालय नांदेड वाघाळा महानगरपालिका हद्दीतील इमारत देवाशिष प्लॉट नं.४५ सर्वे नं.४६.४७ घामोडिया फॅक्टरी, डॉ.लेन नांदेड या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर १७८८.३१ चौ. फूट (१६६.१४ चौ.मी.) जागेत कार्यरत आहे. सदर जागेचा करारनामा दिनांक ०४/०२/२०२६ रोजी संपुष्टात आला आहे. महाराष्ट्र राज्य, सहकारी अपिल न्यायालय, मुंबई यांनी सहकार न्यायालय, नांदेड या न्यायालयाचा दिनांक ०५/०२/२०२६ ते दिनांक ०४/०२/२०२९ (एकूण ३ वर्षे) या कालावधीचा दरमहा रुपये ८५,०००/- (रुपये पंच्याऐंशी हजार फक्त) (महानगरपालिका कर, पाणीपट्टी, विद्युत कर व इतर कर वगळून) दराने व इतर अटी-शर्ती दिनांक ०५/०२/२०२६ रोजीच्या भाडे करारनाम्याच्या मसूदाप्रमाणे मान्यता देण्याबाबतचा सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भाधीन पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

सहकार न्यायालय, नांदेड या न्यायालयाचा वाघाळा महानगरपालिका हद्दीतील इमारत देवाशिष प्लॉट नं.४५ सर्वे नं.४६.४७ घामोडिया फॅक्टरी, डॉ.लेन नांदेड या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील १७८८.३१ चौ. फूट (१६६.१४ चौ.मी.) या जागेचा दिनांक ०५/०२/२०२६ ते दिनांक ०४/०२/२०२९ (एकूण ३ वर्षे) या कालावधीकरिता दरमहा रक्कम रुपये ८५,०००/- (रुपये पंच्याऐंशी हजार फक्त) (महानगरपालिका कर, पाणीपट्टी, विद्युत कर व इतर कर वगळून) इतक्या दराने जागा भाडयाने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२.	हे आदेश वित्त विभाग, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील अ. क्र. १०, नियम ११५ अन्वये कार्यालयासाठी जागा भाड्याने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजूरी देण्याबाबत प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३.	उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१५१६०१४२५४४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.07.15 16:03:10 +05'30'

(अंकुश शिंगाडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. प्रधान सचिव (सहकार व पणन),सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग , मंत्रालय, मुंबई.
२. सहकार आयुक्त तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. निबंधक, महाराष्ट्र राज्य सहकार अपिल न्यायालय, मुंबई.
४. न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड.
५. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महराष्ट्र राज्य, नागपूर.
७. महालेखापाल-१ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल-२ (लेखापरिक्षण) महाराष्ट्र राज्य.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.
१०.निवड नस्ती (२२-स).